...nances of Maratha Government

(1763-73)

# सरकारी-आयव्यय

(इ. स. १७६३-७३)

# सरकारी आयव्यय

(इ. स. १७६३-८३)

|

ऑफ फिलॉसॉफी पदवीसाठी

णे विद्यापीठास सादर केलेला

प्रबंध

— माधव दत्तात्रेय आपटे

# प्रबंधाची प्रकरणे


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| १) | विषयाचे स्वरूप व साधनांची मर्यादा | ३ - २५ |
| २) | तर्जुम्याचा अंतरंग | २६ - ४५ |
| ३) | सरकारी आयव्यय व कारभार यंत्रणा | ४६ - ७६ |
| ४) | सरकारी अुत्पन्न | ७७ - १०५ |
| ५) | सरकारी खर्च | १०६ - १२६ |
| ६) | अैनजिनसीचा व्यवहार | १२७ - १५१ |
| ७) | कर्जाचा व्यवहार | १५२ - १९२ |
| ८) | खंडणी | १९३ - २०३ |
| ९) | सरकारी आयव्ययाची रहाटी | २०४ - २०९ |
| १०) | परिशिष्ट १ अैनजिनसीची यादी | २१० - २१५ |
| ११) | परिशिष्ट २ तर्जुमा | २१६ - २३५ |
| १२) | परिशिष्ट ३ संशोधनासाठी मार्गदर्शन | २३६ - २४१ |

# प्रस्तावना

या प्रबंधाविषयी काही खुलासा करणे आवश्यक आहे. ऐतिहासिक अस्सल मोडी कागदपत्रांचे, पत्रे व हिशेबी कागद, असे दोन वर्ग केले तर प्रस्तुतच्या प्रबंधात हिशेबी कागद या वर्गात मोडणाऱ्या कागदपत्रांचा प्रामुख्याने उपयोग केला आहे या प्रकारच्या कागदपत्रांत तत्कालीन रूढ असणारे व परंपरागत वळणाचे कितीतरी पारिभाषिक शब्द येतात. त्यापैकी ज्या शब्दांचे अर्थ ऐतिहासिक मोडी कागदपत्रांशी निकटचा संबंध असलेल्या संशोधकास परिचित असतात, त्यांचे स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता नाही या विचाराने या प्रबंधात त्याचे विवेचन कटाक्षाने टाळलेले आहे. तरीही अपवाद म्हणून काही पारिभाषिक शब्दांचा ऊहापोह केला आहे.

हिशेबी कागदांतून आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत संख्यात्मक माहिती मिळते व त्याच्या आधारावर आर्थिक व्यवहाराचे निव्वळ वर्णन करीत बसण्यापेक्षा विशिष्ट कालावधीत व्यवहाराच्या अनुरोधाने आर्थिक उलाढाल कशी झालेली दिसते याची जुळणीकरण्याचा यात प्रयत्न आहे.

अशा प्रकारचा अभ्यास केल्यास त्यातून पेशवे कालीन अर्थव्यवहाराचे स्वरूप उलगडण्यास बरीच मदत होईल असे माझे गुरू श्री धनंजयराव गाडगीळ व माझे शिक्षक प्रसिध्द इतिहास संशोधक श्री. ग. ह. खरे यांनी सुचविल्यावरून हा विषय प्रबंधासाठी निवडला.

हा विषय सुचविला एवढेच नव्हेतर डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी मी हे काम चिकाटीने करावे यासाठी वेळात वेळ काढून सर्व प्रकारचे कष्ट घेतले.

खऱ्या अर्थाने मराठयांच्या आर्थिक इतिहासाच्या जुळणीची अजून सुरवात व्हावयाची आहे असे त्यांचे मत त्यांनी बोलून दाखविले.

३

संशोधन ही कष्टसाध्य गोष्ट आहे व त्यासाठी व्यासंग लागतो याची पूर्ण कल्पना प्रबंधकाराला आहे. आपल्या बुध्दीच्या मर्यादा ओळखून प्रबंधकाराने हा विषय मांडला आहे.

मला डॉ. धनंजयराव यांचे मार्गदर्शन अखंडपणे लाभले व माझे शिक्षक ग.ह.खरे यांनी अत्यंत आपुलकीने माझेकडून हे काम करुन घेतले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.